महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
Email : irdho123@gmail.com website : www.mahadiscom.in दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
सी. आय. एन. नं. U४०१०९MH२००५SGC१५३६४५९

जा.क्र. औसंवि/ब/सहविमा/३३८२९ दिनांक : २५/१०/२०२४

# परिपत्रक

विषय : सुधारीत वितरण क्षेत्र योजनेमार्फत (RDSS) देण्यात येणाऱ्या व अशा प्रकारच्या इतर योजनांच्या सर्व प्रकारच्या कंत्राटी कामांचा व ते काम पुर्ण होईस्तव त्यावरील नियुक्त कामगारांच्या नुकसान भरपाईचा विमा शासकीय विमा निधीकडेच उतरविणेबाबत.

संदर्भ : १. शासन निर्णय वित्त विभाग क्र. एआयएफ-२९८३/सीआर/१७४/८३एडीएम-५ दि. १६/०१/१९८४.
२. शासन निर्णय वित्त विभाग क्र. विमास/१०९८/प्र.क्र.२९/९८शासन हमी/मंत्रालय, मुंबई-३२ दि. १९/०८/१९९८.
३. शासन निर्णय क्र. विमास-१०११/प्र.क्र.१५/विमा प्रशासन, मंत्रालय, मुंबई दि. २९/०४/२०११.
४. शासन निर्णय क्र. २०२२/प्र.क्र.०२/विमा प्रशासन दि. ०५/०५/२०२२.
५. शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१८/प्र.क्र.४७/विमा प्रशासन दि. १३/०७/२०२२.
६. उप विमा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. प्राविनि-२३२३/सहविमा/सुधारित वितरण क्षेत्र योजना/फ. दि. ११/०३/२०२४.

*********

उप विमा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संदर्भ क्र. ६ च्या पत्रान्वये, सुधारीत वितरण क्षेत्र योजने अंतर्गत उतरविण्यात येणाऱ्या व अशा प्रकारच्या इतर योजनांच्या सर्व प्रकारच्या विविध कंत्राटी कामाचा उभारणीचा विमा (EAR), कंत्राटी कामाचा विमा (CAR), कामगारांच्या नुकसान भरपाईचा विमा (EC), मरीन कार्गो कम उभारणी विमा (MCE), वाहतूक कम उभारणी विमा (TCE), इत्यादी प्रकारचा विमा शासकीय विमा निधी या कार्यालयाकडे थेट पध्दतीने संदर्भांकित शासन निर्णयास अनुसरुन उतरविणे क्रमप्राप्त आहे. मात्र, कंत्राटदारांना स्थानिक व तत्पर विमा सेवा मिळावी म्हणून **दि न्यु इंडीया अश्युरन्स कं.लि., दि ओरिएंटल इन्शुरन्स कं.लि, युनायटेड इन्शुरन्स कं.लि. व नॅशनल इन्शुरन्स कं.लि.** या चार राष्ट्रीयकृत विमा कंपन्याच्या कार्यालयांमार्फत **सहविमा पध्दतीने** विमा उतरविण्यासाठी खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून अनुमती देण्यात येत असल्याचे कळविण्यात आले आहे.

१. संदर्भ क्र. ४ व ५ च्या शासन निर्णयामधील नमूद कार्यपध्दतीस अनुसरुन विविध कंत्राटी कामाचा विमा उतरविणे बंधनकारक राहील.
२. नमुद चार राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडून विमा उतरविण्यापूर्वी विमा कंपनीने विमा संचालनालयाची पुर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.

३. संदर्भ क्र. ४ अन्वये विमा जोखिम विभागणीचा अधिकार हा सर्वस्वी विमा संचालनालयाचा असून, जोखिमेचे स्वरुप, क्लिष्टता, परिणाम, विमा दाव्यांची वारंवारता इत्यादी बाबी विचारात घेऊन विमापत्रात किती दायित्व स्विकारावे याबाबत प्रकरणपरत्वे अभ्यास करुनच विमा जोखिम विभागण्यात येते. त्यामुळे विमा जोखिम विभागणीस विमा संचालनालयाची संमती घेणे बंधनकारक राहील.

४. विमा संचालनालयाने सहविमा पध्दतीने चार राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडे विमा उतरविण्यास **अनुमती** व विमा जोखिम विभागणीस **संमती** दिल्यानंतर निर्गमित सहविमापत्रे विमा संचालनालयास सादर करुन संबंधित कंत्राटदारांनी विमा संचालनालयाकडून **"ना हरकत प्रमाणपत्र" घेणे बंधनकारक आहे व सदर पुर्वानुमती पत्र व ना हरकत प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय सहविमापत्रे संबंधित कार्यालयाकडून ग्राह्य धरण्यात येऊ नयेत.**

५. राष्ट्रीयकृत विमा कंपनीचे विमापत्र जारी करणारे कार्यालय स्थानिक कार्यालय असणे बंधनकारक आहे.

६. एखाद्या सहविमापत्राखाली विमादावा उद्‌भवल्यास त्याची माहिती तात्काळ विमा कंपनीस व विमा संचालनालयास कळविण्यात यावे. तसेच, उद्‌भवलेल्या विमादाव्याची अंदाजित रक्कम रु. ५,००,०००/- पेक्षा जास्त असल्यास अशा विमा दाव्याचे सर्वेक्षण करण्यासाठी विमा संचालनालयाच्या अनुमतीने सर्वेक्षकाची नेमणूक करणे विमा कंपनीस बंधनकारक राहील.

७. तथापि, कंत्राटदारांनी वरील अटी व शर्तींचे अनुपालन न करता परस्पर विमापत्रे घेतल्यास व त्यामुळे शासकीय महसुलाचे नुकसान होऊन त्यासंबंधात लेखा आक्षेप उद्‌भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कार्यालयाची असेल याची कृपया नोंद घ्यावी.

सदरचे परिपत्रक महावितरण कंपनीच्या Employee Portal वरील Circular-(IR Department) येथे उपलब्ध असून त्याची मुद्रांकीत प्रत प्रसारीत करण्यात येणार नाही.

(संजय रा. ढोके)
**मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी**

प्रत :-
प्रेषण यादीप्रमाणे महावितरण कंपनीतील कार्यकारी अभियंता व तत्सम स्तरापर्यंत

प्रत माहितीस्तव :-
उप विमा संचालक, विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

D:\SSPisey 3\MISC\CAR TCE_Welfare Cess\CAR TCE insurance.docx